# Activity regarding MOU with Rotary Club Omerga

In the year 2018-19 a MOU is signed between Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti and Rotary Club Omerga. A MOU is signed on 01.07.2018, between Principal of Shrikrishna Mahavidyalaya, Gunjoti and Mr. Snatram Murjani, president of Rotary Club Omerga. On the same day a tree platntation programme was conducted in the college campus. For this event most of the management members, staff members, Rotarians, and students were present for this programme.





**Tree Plantation Programme**

## २) वृक्षारोपणः

राष्ट्रीय सेवा योजना विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांचे दि. १३.०६.२०१८ रोजीचे पत्र व मा. महाराष्ट्र शासन यांचे १३ कोटी वृक्षलागवड संकल्प याची पुर्तता करण्यासाठी महाविद्यालयात दि. ०१.०७.२०१८ ते दि. १५.०७.२०१८ दरम्यान वृक्षलागवड व वृक्षसंवर्धन पंधरवाडा साजरा करण्यात आला. मागील कांही वर्षापासून सतत होणारे अवर्षण, अनियमित पर्जन्य, तसेच सतत पडणारा दुष्काळ व पाण्याचे दुर्भिक्ष्य व या सर्व बाबीचा विचार करता झाडांची मोठ्या प्रमाणात लागवड व त्याहीपेक्षा त्यांचे संवर्धन करणे ही काळाची गरज ठरलेली आहे. वृक्षलागवडीचे अनन्यसाधारण महत्व लक्षात घेऊन महाविद्यालयात शै. वर्ष. २०१४-१५ मध्येच प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी, रा. से. यो. चे कार्यक्रमाधिकारी डॉ. राम कदम, व भूगोल विभागाचे विभागप्रमुख डॉ. मिलिंद सुर्यवंशी यांच्या विचारातून व प्रयत्नातून महाविद्यालयाचे सर्व कर्मचारी व रासेयो चे विद्यार्थी यांनी एकत्रितपणे "पर्यावरण मंडळाची" स्थापना केलेली आहे. या मंडळामार्फत महाविद्यालयात विविध पर्यावरण विषयक उपक्रम राबवले जातात. तसेच हे मंडळ दरवर्षी कांही झाडे दत्तक घेऊन त्यांचे संवर्धन करते. त्यामुळे महाविद्यालयाच्या परीसरात वृक्षांची संख्या दिवसेंदिवस वाढते आहे. तसेच २०१६-१७ मध्ये महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे "इको क्लब' ची स्थापना करण्यात आलेली आहे. याअंतर्गत रासेयो चे कार्यक्रमाधिकारी डॉ. राम कदम, डॉ. डी. पी. चव्हाण व डॉ. एम. जे. अंबुसे व विद्यार्थी महाविद्यालयाच्या परीसराची देखभाल करतात.

दि. ०१.०७.२०१८ रोजी महाविद्यालयात कृषी दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयात वृक्षारोपण व परिसरातील आदर्श शेतक-यांचा सत्कार असे कार्यक्रम घेण्यात आले. दि. २६.०६.२०१८ पासून गुंजोटी परीसरात प्रत्यक्ष भेटी देऊन वृक्षलागवडीचे महत्व पटवुन देण्यात आले तसेच दि. ०१.०७.२०१८ रोजी महाविद्यालयात वृक्षलागवडीस उपस्थित राहणेचे अवाहन करण्यात आले. दि. ०१.०७.२०१८ रोजी सकाळी १०.३० वाजता संस्थेचे सचिव मा. डॉ. दामोदरजी पतंगे साहेब यांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करुन सप्ताहाचा शुभारंभ करण्यात आला. सदरील कार्यक्रमास संस्थेचे सर्व पदाधिकारी, गुंजोटी ग्रामपंचायतचे सरपंच, उपसरपंच व सदस्य तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. आर. डी. पात्रे रासेयो चे कार्यक्रमाधिकारी डॉ. आर. एच. कदम, डॉ. डी. पी. चव्हाण, डॉ. एम. जी. अंबुसे व सर्व कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच शै. वर्ष. २०१८-१९ मध्ये रासेयो विभाग व रोटरी क्लब उमरगा यांच्यात परस्पर सहकार्याचा करार करण्यात आला व त्या अनुषंगाने रोटरी चे सर्व पदाधिकारी या कार्यक्रमास उपस्थित होते. एक अनोखा उपक्रम सुद्धा या वेळेस राबवण्यात आला तो म्हणजे मागील वर्षी लावण्यात आलेल्या झाडाचा वाढदिवस सर्वांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. दि. ०१.०७.२०१८, ०५.०७.२०१८ व ०६.०७.२०१८ रोजी महाविद्यालयाच्या परीसरात १०० रोपे व दि. २५.०७.२०१८ रोजी दत्तक गाव मौजे एकोंडी येथे १८० रोपांची लागवड करण्यात आली. २०१८-१९ या शै. वर्षात किमान ३०० वृक्षांची लागवड करण्याचे उद्दिष्ट ठरवण्यात आले आहे. सदरील कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी रासेयो च्या कार्यक्रमाधिका-यांबरोबरच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. कुलकर्णी, डॉ. आर. डी. पात्रे व लोकमतचे पत्रकार श्री. सिद्धु देशमुख यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**Scanned Report of Tree plantation Activity submitted by NSS unit to university in local language.**